## प्रकरण ४

# उपसंहार

## प्रकरण ४

# उपसंहार

'चारित्रवर्धनाची शिशुहितैषिणी : एक चिकित्सक अभ्यास' या प्रबंधाद्वारे एका अप्रकाशित टीकाकाराला प्रकाशात आणण्याचे काम केले आहे. ज्या टीकाकाराची साधी माहितीही मिळत नाही त्याची रघुवंशावरील टीका हाताळण्यास नाजूक असलेल्या हस्तलिखिताच्या आधारे अभ्यासकांना उपलब्ध करून दिली आहे. एकाच हस्तलिखितावर आधारित टीकेचे संपादन करणे हा प्रस्तुत प्रबंधाचा मुख्य विषय होता. तथापि एकाच टीकेच्या आधारे संपादन हे दुर्धर काम आहे. म्हणून दुसऱ्या अत्यंत जीर्ण हस्तलिखिताच्या आधारे अधिकाधिक चांगली आवृत्ती देण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात केला आहे.

या संपादनाच्या निमित्ताने इतर आनुषङ्गिक प्रश्नांची उत्तरे शोधली आहेत. चारित्रवर्धन हा जैन टीकाकार तर मल्लिनाथ हा जैनेतर हिन्दू टीकाकार. चारित्रवर्धन राजस्थान गुजरात या भागातला असावा. तर मल्लिनाथ हा आन्ध्रातला. त्या दोघांची पाठपरंपरा भिन्न असणारच. प्रस्तुत प्रबंधात त्यांच्या पाठामधील भेद सूक्ष्मदृष्ट्या हाताळले आहेत. तथापि, एक प्रश्न अद्यापि अनुत्तरित राहतो. चारित्रवर्धन हा मल्लिनाथाहून प्राचीन टीककार. तो १२ ते १४ या कालखंडात होऊन गेलेला टीकाकार. तर मल्लिनाथ १५व्या शतकातला. असे असूनही मल्लिनाथ चारित्रवर्धनाचा नामोल्लेख कुठेच करत नाही. या मागे काय कारण असू शकते? चारित्रवर्धनाची टीका पाठशाळेत बंदिस्त झाल्यामुळे मल्लिनाथापर्यंत पोचू शकली नाही की सांप्रदायिकता आड आल्यामुळे मल्लिनाथाने त्याला अनुल्लेखाने मारले? मल्लिनाथाच्या प्रतिज्ञेप्रमाणे त्याने रघुवंशाला 'संजीवनी' दिली. तत्पूर्वी रघुवंश 'दुर्व्याख्याविषमूर्च्छित' असा होता. मल्लिनाथाला अभिप्रेत असलेल्या 'दुर्व्याख्या' कोणत्या? वल्लभ व चारित्रवर्धन या भिन्न संप्रदायातील टीकाकारांच्या तर नव्हेत? मल्लिनाथाच्या व चारित्रवर्धनाच्या टीकांचा अधिक सूक्ष्मपणे व तौलनिक अभ्यास केल्यास या प्रश्नाचे उत्तर मिळू शकेल. त्याचप्रमाणे दिनकराची टीका प्रकाशित केली तर जैन टीकाकारांची समृद्ध परंपरा दृढ होईल.

या प्रबंधाच्या निमित्ताने आणखी एक मुद्दा दृष्टोत्पत्तीस आला, तो म्हणजे चारित्रवर्धनाचे व्यक्तिमत्त्व प्राचीन टीकाकारांच्या बाबतीत 'कवि तो होता कसा आननी' हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. त्यांचे शारीरिक व्यक्तिमत्त्व टीकेतून शोधता आले नाही तरी त्यांचे आत्मिक व्यक्तिमत्त्व टीकेतून शोधता येते. चारित्रवर्धन हा विद्वान, शास्त्रपारंगत, अभ्यासू व तार्किक विचारसरणीचा प्रज्ञावंत होता. अनेक शास्त्राचे, कोशांचे, दाखले देत तो कालिदासाचे श्लोक स्पष्ट करतांना दिसतो. जैन पाठशाळेतील तो वाचनाचार्य आहे. वाचनाचार्य म्हणजे बहुधा शिष्यांकडून ग्रंथ पाठ करून घेणारा शिक्षक. जैन पाठशाळेमध्ये संस्कृत ग्रंथाचे पठण होत असे. जैनेतर ग्रंथांपैकी न्यायशास्त्राच्या ग्रंथाचा अभ्यास तेथे होत असे. चारित्रवर्धनाच्या विचारसरणीमध्ये, त्याच्या विवेचनामध्ये, न्यायशास्त्राच्या विचारांची, त्यांच्या विवेचन पद्धतीची छाप दिसते. उदाहरणार्थ पहिल्या श्लोकामधील विवेचन पहावे.

चारित्रवर्धनाची प्रस्तुत प्रबंधात प्रकाशित केलेली टीका रघुवंशाच्या अभ्यासाला निश्चितच नुसता उजाळाच नव्हे तर चालना देणारी ठरेल. चारित्रवर्धनाच्या टीकेचा आणखी एक विशेष दृग्गोचर झाला, तो म्हणजे त्याला माहित असलेला अमरकोशाचा पाठ. त्याचा पाठ प्रकाशित आवृत्तीहून बराच भिन्न आहे. या दोहोंचा तौलनिक अभ्यास अमरकोशाच्या अभ्यासाला चालना देऊ शकेल.

एकंदरित प्रस्तुत प्रबंधामुळे रघुवंशाची एक महत्त्वाची अप्रकाशित टीका तर प्रसिद्ध झालीच शिवाय तिचे मल्लिनाथाच्या टीकेहून वेगळेपणही लक्षात आले आहे.